

# रयत शिक्षण संस्था, सातारा

## कर्मवीर विद्याप्रबोधिनी
## पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील
## राज्यस्तरीय महाविद्यालयीन
# वक्तृत्व स्पर्धा २०२६

वर्ष ३८ वे

### स्पर्धेचे विषय :-

१. शिक्षणाच्या परिवर्तनाची प्रयोगशाळा : रयत शिक्षण संस्था
२. या लोकशाहीची चिंता वाटते !
३. लग्न : चिंता आणि चिंतन
४. शेती चांगलीच असते !
५. आभासी जगातील स्त्री स्वातंत्र्य
६. विसरून जाऊ सारे क्षणभर...

### * बक्षिसे *

- प्रथम क्रमांक ₹ २५,०००/- कायमचा चषक
- द्वितीय क्रमांक ₹ १५,०००/- व सन्मानचिन्ह
- तृतीय क्रमांक ₹ १०,०००/- व सन्मानचिन्ह
- सांघिक पारितोषिक ₹ कायमचा चषक
- खास पारितोषिके ₹ प्रत्येकी रु.५,०००/- ची उत्तेजनार्थ १० पारितोषिके व सन्मानचिन्ह

### स्पर्धेच्या अटी :-

- तयारीच्या भाषणाला ७ मिनिटे (५+२) व उत्स्फूर्त भाषणाला ५ मिनिटे (४+१) अशा वेळा दिल्या जातील. (सर्व स्पर्धकांची तयारीची भाषणे संपल्यावर ऐनवेळी दिलेल्या विषयांवर उत्स्फूर्त भाषणे होतील.)
- स्पर्धकांच्या तयारीच्या भाषणातील गुणांनुसार उत्स्फूर्त भाषणासाठी स्पर्धकांची शॉर्ट लिस्ट केली जाईल व अशा निवडक स्पर्धकांनाच उत्स्फूर्त भाषणासाठी संधी दिली जाईल.
- उत्स्फूर्त भाषण सुरु करण्यापूर्वी प्रत्येक स्पर्धकाला विचार करण्यासाठी ५ मिनिटे वेळ दिला जाईल. तयारीची व उत्स्फूर्त भाषणे क्रमवारीने न होता लॉटस् पध्दतीने होतील.
- मराठी, हिंदी, इंग्रजी यापैकी कोणत्याही एका भाषेत तयारीचे व उत्स्फूर्त भाषण करता येईल.
- स्पर्धेच्या तारखेदिवशी ज्या स्पर्धकांचे वय २५ वर्षापेक्षा अधिक असेल त्यांना या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.
- डी.एल.एड्.(डी.एड्.) कॉलेज, ज्युनि. कॉलेज, मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी व बहिस्थ विद्यार्थ्यांना या स्पर्धेत प्रवेश दिला जाणार नाही.
- स्पर्धकांना कोड क्रमांक दिला जाणार आहे. स्पर्धकाने भाषणाच्यावेळी स्वत:चे नाव अथवा कॉलेजचे नाव सांगावयाचे नाही. त्यांनी फक्त आपला कोड क्रमांक सांगायचा आहे.
- निवेदकांनी स्पर्धकाचा कोड क्रमांक पुकारल्यानंतर स्पर्धक गैरहजर राहिल्यास त्याच्या एकूण गुणातून ५ गुण वजा केले जातील. या नियमाची अंमलबजावणी काटेकोरपणे अंमलात आणली जाईल याची सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी.
- कोणत्याही मान्यताप्राप्त वरिष्ठ महाविद्यालयातील (सिनिअर कॉलेज) जास्तीत जास्त दोन स्पर्धकांना प्रवेश दिला जाईल. तयारीचे व उत्स्फूर्त भाषण यातील सरासरी गुणांवरून पारितोषिके दिली जातील.
- परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

**स्पर्धा कालावधी : दि.२१/०१/२०२६ ते २२/०१/२०२६ (उद्घाटन : बुधवार दि.२१/०१/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा.)**

| | |
|---|---|
| * रजिस्ट्रेशन विषयी महत्त्वाची सूचना | स्पर्धकाने सोबत दिलेल्या स्कॅनरने किंवा https://forms.gle/VxZSxPUxb39rigYW9 या लिंकने गुगल फॉर्म भरावा. तसेच आपल्या स्पर्धेतील सहभागाची नोंद ई-मेल /फोनने दि.२०/०१/२०२६ रोजी सायं.७.०० पर्यंत करणे बंधनकारक आहे. या स्पर्धेत स्पर्धकास प्रवेश देण्याचा निर्णय संपूर्णपणे संयोजन समितीवर राहील. |
| * स्पर्धेचे ठिकाण | छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (पोवई नाका) |
| * प्रवेश फी | प्रत्येक स्पर्धकास रु.६००/- (संघासाठी रु. १२००/-) प्रवेश फी असून फीसह स्पर्धकांची माहिती (नाव, कॉलेज, वर्ग इ.) ईमेल/पोस्टाने पाठविण्यासाठी अंतिम मुदत दि.२०/०१/२०२६ पर्यंत राहील. (प्रवेशासाठी ओळखपत्र, जन्म तारखेचा पुरावा व कॉलेजचे पत्र आवश्यक) |
| * प्रवेश फी करिता बँक तपशील | बँकेचे नाव : दि रयत सेवक को-ऑप. बँक लि.,सातारा शाखा : छत्रपती शिवाजी कॉलेज परिसर खाते क्र.: 012036000121 IFSC code : IBKL0485RSC खातेदार नाव : प्राचार्य,छ.शिवाजी कॉलेज,सातारा |
| * निवास व्यवस्था | स्पर्धकांची निवास व्यवस्था स्पर्धेच्या ठिकाणी करण्यात आलेली आहे. |
| * भोजन व्यवस्था | स्पर्धा कालावधीत प्रत्येक दिवशी फक्त दुपारी वर्किंग लंचची व्यवस्था केली आहे. |

कर्मवीर विद्याप्रबोधिनी वक्तृत्व स्पर्धा २०२६
WhatsApp Group QR


पत्रव्यवहारासाठी पत्ता : प्राचार्य, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (पोवई नाका) ता. जि. सातारा-४१५ ००१

समन्वयक : प्रा.डॉ.संदीप किर्दत मो.: 8329729498 सहसमन्वयक : प्रा.डॉ.विद्या नावडकर मो.: 9049041979

फोन : 02162-234678 ईमेल : principal.shivajicollege@gmail.com वेब : www.rayatshikshan.edu


रजिस्ट्रेशन QR Code

| प्रिं.डॉ.राजेंद्र मोरे | प्रिं.डॉ.विजयसिंह सावंत | प्रिं.डॉ.शिवलिंग मेनकुदळे | मा.विकास देशमुख IAS (Retd.) |
|---|---|---|---|
| प्राचार्य, छत्रपती शिवाजी कॉलेज,सातारा<br>सहसचिव (ऑडिट),रयत शिक्षण संस्था,सातारा | कार्यकारी संचालक,<br>कर्मवीर विद्याप्रबोधिनी | सहसचिव (उच्च शिक्षण)<br>रयत शिक्षण संस्था,सातारा | सचिव<br>रयत शिक्षण संस्था,सातारा |

मा. प्राचार्य,

---------------------------------

---------------------------------

महोदय,

रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था आहे. या संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या वतीने छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे २१ व २२ जानेवारी,२०२६ रोजी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही वक्तृत्व स्पर्धा अतिशय मानाची अशी स्पर्धा आहे. दरवर्षी या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून स्पर्धक येतात. तरी या स्पर्धेकरिता आपल्या महाविद्यालयाचे स्पर्धक (संघ) पाठवून सहकार्य करावे ही विनंती.

तसेच सदर स्पर्धेची माहिती विविध सोशल माध्यमातून आपल्या संपर्कातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व प्राचार्य यांचेपर्यंत पोहचवावी.

-------------------

स्पर्धेसाठी नावनोंदणी लिंक ☞ https://forms.gle/VxZSxPUxb३९rigYW९

स्पर्धेसाठी WhatsApp group जॉईन करा☞
https://chat.whatsapp.com/FV०NpjqokCD१३OTpV१uJp३?mode=hqrt२

यु ट्यूब लिंक जॉईन करा ☞
https://www.youtube.com/@shivajicollegesatara